भु. नि. अर्ज क्र.१८९/२०१८
शामराव – वि – महा. शासन

**<u>निशाणी क्र.३४ वरील आदेश</u>**
**(दि.१०.०३.२०२६ रोजी पारीत)**

. गैरअर्जदार क्र.१ यांनी त्यांच्या विरुध्द् पारित झालेला विना लेखी जबाबाचा आदेश रद्द करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर अर्जदाराने आपले लेखी म्हणणे सादर करून सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे. अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार क्र.१ यांना नोटीसची बाजावणी होऊन ते प्रकरणात हजर झाले परंतु त्यांनी विहित मुदतीत त्यांचा लेखी जबाब दाखल न केल्यामुळे त्यांच्या विरुध्द विना लेखीजबाब चा आदेश पारीत करण्यात आला होती. तरी गैरअर्जदार क्र.१ ने दाखल केलेला सदरचा विना लेखी जबाब चा रद्द करण्याबाबत अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. अर्जाची व लेखी जबाबाची पाहणी केली. दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. सदर प्रकरणात गैरअर्जदार हे शासनाचे अधिकारी असल्यामुळे व

प्रकरणात योग्य तो न्यायनिर्णय होण्यासाठी त्यांच्या विरुध्द झालेला लेखी जबाब नाही चा आदेश रद्द करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

गैरअर्जदार क्र.१ यांचा नि.क्र.३४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

ASHVINI PRAVIN DIWAN
Digitally signed by ASHVINI PRAVIN DIWAN
Date: 2026.03.11 17:13:49 +0530

(अश्वीनी प्र. दिवाण)

दि.१०.०३.२०२६ दिवाणी न्यायाधीश(व.स्तर),जालना